क्र.साप्रवि/रवका/गणवेष/न.क्र.५/

**महाराष्ट्र राज्य विद्युत् वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
**मुंबई - ४०० ०१९.**

**महावितरण**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

## प्रशासकीय परिपत्रक क्र. ११८ दिनांक २३/०८/२००७

**विषय** : महावितरण कंपनीमध्ये कार्यरत असलेल्या गणवेष पात्र कर्मचा-यांना देण्यात येणा-या धुलाई भत्त्याच्या दरामध्ये वाढ करणेबाबत.

**संदर्भ** : सा.आ.क्र.९८ दि.२३.९.१९८० चे सुधारपत्र क्र.१४ दि.१३ जून १९९६

......

सामान्य आदेश ९८ (क) दिनांक २३.०९.१९८० चे सुधारपत्र क्र.१४, दि.१३.०६.१९९६ अनुसार महावितरण कंपनीच्या गणवेषपात्र कर्मचा-यांना देण्यात येणा-या धुलाई भत्त्याच्या दरामध्ये वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव कंपनीच्या विचाराधीन होता.

२. याबाबत प्रशासकीय परिपत्रक क्र.१ दि.२९.०९.२००५ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार मा.व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (संचलन) आणि संचालक (वित्त) यांचेशी विचारविनिमय करुन महावितरण कंपनीतील सर्व गणवेषपात्र कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या धुलाई भत्त्याच्या विद्यमान दरामध्ये वाढ करुन दरमहा रु.३०/- (रु.तीस) ऐवजी दरमहा रु.६० (रु.साठ फक्त) असा सुधारित दराने धुलाई भत्ता देण्यास मान्यता दिली आहे.

३. धुलाई भत्त्यासाठीचे सदर सुधारित दर दि.०१ ऑगस्ट २००७ पासून लागू होतील.

४. सर्व नियंत्रण अधिकाऱ्यांनी महावितरण कंपनीच्या सर्व गणवेषपात्र कर्मचाऱ्यांना स्वच्छ व नीटनेटका गणवेष कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत परिधान करण्यासाठी सक्ती करावी.

५. सदर प्रशासकीय परिपत्रकातील सूचना सर्व गणवेषपात्र कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून त्यांचेकडून तशी नोंद घेण्यात यावी आणि त्यातील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यासाठी सूचना द्याव्यात.

सु.य.पाटील

**( सु. य. पाटील )**
मुख्य महाव्यवस्थापक (क)

प्रत :
१) महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीनुसार सर्वांना
२) न.क्र.७८१/रवका, धारावी

*K/Adm.Cir.- Uniform*
*23/8/07*